# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४१** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- २३१** **दिनांक :-१३/०२/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.२९/०१/२०२५ बुधवार रोजी सकाळी - ११.०० वाजता झालेली सभा क्र.३९ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.२९/०१/२०२५ बुधवार रोजी सकाळी - ११.०० वाजता झालेली सभा क्र.३९ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.२९/०१/२०२५ बुधवार रोजी सकाळी - ११.०० वाजता झालेली सभा क्र.३९ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४१** **(स्थायी समिती)**

---

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र.:- २३२** **दिनांक :-१३/०२/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/१९२७/२०२४-२५ दि.०६/०२/२०२५

३. निविदा समितीचा निर्णय.

**विषय :-** लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्त्यात सुधारणा योजना २०२४-२५ अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.०१ मधील दुध फेडरेशन रस्त्यापासुन सबस्टेशन , सुरेश कलेक्शन, सिटी कॉलनी रस्त्यापर्यंत दोन्ही बाजुस ब्लॉक बसविणे कामी मक्तेदार जितेश गणेश ठाकरे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.११०% कमीचे दरास मान्यता देणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ व ३ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्त्यात सुधारणा योजना २०२४-२५ अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.०१ मधील दुध फेडरेशन रस्त्यापासुन सबस्टेशन , सुरेश कलेक्शन, सिटी कॉलनी रस्त्यापर्यंत दोन्ही बाजुस ब्लॉक बसविणे कामास जिल्हाधिकारी,जळगांव यांचे कडील पत्र क्रं.नप/ समाजकल्याण/ ना.द.व.सु.यो./५९/२०२४ दि.२५/०९/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार एकत्रित ई निविदा प्रसिध्द करण्यास आयुक्त, मनपा यांचे दि.२७/०९/२०२४ च्या मान्यतेनूसार उक्त कामाची ई निविदा सुचना क्र.५३३ संकेतस्थळावर प्रसिध्द केली असता निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०४ मक्तेदारांच्या ई निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या असून महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ मंत्रालय मुंबई दि.२७/०९/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार तिन निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार आलेल्या ई-निविदांचे कागदपत्रांची छाननी केली असता त्यात एकही ई निविदा पात्र झालेली नसल्याने उक्त कामाची दुसऱ्या वेळेस ई निविदा प्रसिध्द करणेस आयुक्त यांनी मान्यता दि.०९/१२/२०२४ रोजी मान्यता दिल्यानुसार उक्त कामाची दुसऱ्या वेळेस ई निविदा सुचना क्रं.५७७ संकेतस्थळावर प्रसिध्द केली असता निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०३ ई-निविदा संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सी एटी-२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ मंत्रालय,मुंबई दि.२७/०९/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार तिन निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार आलेल्या ई-निविदांचे कागदपत्रांची छाननी केली असता त्यात खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने प्राप्त ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.५५,५०,२५४/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | जितेश गणेश ठाकरे | निविदा रक्कमेपेक्षा ०.११०% कमीचे दर | रु.५५,४४,१४९/- |

वरील तुलनात्मक तकत्यानूसार मक्तेदार जितेश गणेश ठाकरे यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा ०.११०% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.५५,४४,१४९/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ५५,४४,१४९/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | ९,९७,९४७/- |
| ०३ | कामगार विमा १% | ५५,४४१/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | १२,६३५/- |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | १,२४,६९३/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | ६७,३४,८६५/- |

वर नमुद निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.६७,३४,८६५/- मात्र लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गतच्या निधीतुन करावा लागणार आहे. त्याअनुषंगाने मक्तेदार जितेश गणेश ठाकरे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.११०% कमीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता मिळणेसाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ३ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४१** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०३** **प्रशासक ठराव क्र.:- २३३** **दिनांक :-१३/०२/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/१९१९/२०२४-२५ दि.०६/०२/२०२५
३. सहाय्यक आयुक्त यांचा दि.२३/०७/२०२४ चा अभिप्राय
४. उपायुक्त (NCAP) यांचा दि.२३/०७/२०२४ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.२६/०७/२०२४ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.२६/०७/२०२४ चा अभिप्राय
७. निविदा समितीचा दि.१७/०१/२०२५ चा निर्णय.

**विषय :-** NCAP योजने अंतर्गत प्रभाग क्र.०६ शाहु नगर ते पिंप्राळा रोड रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार श्री. अक्षय यशवंत पवार यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.००१% कमीचे दर आल्याने सदर दरास व एकुण रक्कम रू.१,२१,६७,३३६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ७ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

NCAP योजने अंतर्गत प्रभाग क्र.०६ शाहु नगर ते पिंप्राळा रोड रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामास आयुक्त यांचे कडील दि.२६/०७/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार प्रथम जाहीर निविदा सुचना क्र.५१९ संकेतस्थळावर प्रसिध्द केली असता निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०४ मक्तेदारांच्या ई निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या असून आलेल्या ई-निविदांचे कागदपत्रांची छाननी केली असता त्यात तिनही मक्तेदार यांचे अपुर्ण कागदपत्राच्या आधारे अपात्र ठरविण्यात आले त्यामुळे सदर कामाची दुसरी फेर निविदा प्रसिध्द करणेस आयुक्त यांचे दि.२७/०९/२०२४ च्या मान्यतेने उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.५६२ संकेतस्थळावर प्रसिध्द केली असता निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. त्यानुसार आलेल्या ई-निविदांचे कागदपत्रांची छाननी केली असता अ.नं.०१ चे निविदाधारक निखिल कृष्णराज पाटील हे अपात्र ठरत असुन अ.नं.०२ चे निविदाकार अक्षय यशवंत पवार पात्र ठरत असुन महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि.२७/०९/२०१८ मधील क्लॉज नं.४.३ मधील मुळ प्रारुप निविदेमध्ये कुठलाही बदल न केल्यास नवीन केलेली मागणी ही व्दितीय मागणी समजण्यात येईल अशा मागणीनंतर जर परत एकाकी निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदांबाबत निविदा उघडून प्रचलित कार्यपध्दती नुसार पुढील कार्यवाही करावी अशा निविदेबाबत पुन:श्च फेरनिविदा मागविण्याची आवश्यकता नाही म्हणुन खालील निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.१,०१,७०,२३८/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | श्री.अक्षय यशवंत पवार | निविदा रक्कमेवर ०.००१% कमीचे दरात | रु.१,०१,७०,१३६/- |

वरील तुलनात्मक तकत्यानूसार मक्तेदार श्री.अक्षय यशवंत पवार यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर ०.००१% कमीचे दर आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.१,०१,७०,१३६/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा रक्कमेवर ०.००१% कमी दरा प्रमाणे येणारा अपेक्षीत खर्च रक्कम | १,०१,७०,१३६/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | १८,३०,६२४/- |
| ०३ | कामगार विमा १% | १,०१,७०१/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | ५७,९७५/- |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | ६,९००/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | १,२१,६७,३३६/- |

वर नमुद निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.१,२१,६७,३३६/- मात्र आहे. सदरचा खर्च राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रम या लेखाशिर्षकाखाली मंजुर झाले असल्याने सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात खर्च करावयाचा आहे. त्यानुसार मक्तेदार श्री.अक्षय यशवंत पवार यांचे निविदा रक्कमेवर ०.००१% कमीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता मिळणेसाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ७ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४१** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०४** **प्रशासक ठराव क्र.:- २३४** **दिनांक :-१३/०२/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/१९४९/२०२४-२५ दि.१३/०२/२०२५
३. निविदा समितीचा दि.११/०२/२०२५ चा निर्णय.

**विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद योजने अंतर्गत मनपा सानेगुरुजी अभ्यासीका फर्निचर डिजीटलायजेशन करणे व पुस्तके देण्याच्या वाढीव काम करणे (पार्ट- २) कामी मक्तेदार सिध्दार्थ विनोदकुमार दधिच यांचे निविदा रक्कमेपेक्षा ७% कमीचे दरास मान्यता देणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ व ३ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद योजने अंतर्गत मनपा सानेगुरुजी अभ्यासीका फर्निचर डिजीटलायजेशन करणे व पुस्तके देण्याच्या वाढीव काम करणे (पार्ट- २) कामासा जिल्हाधिकारी, जळगांव यांनी त्याच्या कडील पत्र क्रं. पालिका/कावि-०४/४२२/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. आयुक्त, मनपा यांनी दि.०९/१०/२०२४ रोजी मान्यता दिल्यानुसार उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.५६८ प्रसिध्द करण्यात आली. निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०३ ई- निविदा सदर संकेस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ मंत्रालय मुंबई दिनांक २७/०९/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार तिन निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे त्यानुसार आलेल्या ई- निविदा कागदपत्रांची छाननी केली असता त्यात एकही निविदा पात्र झालेली नसल्याने दुस-या वेळेस ई निविदा प्रसिध्द करण्यास व या करीता येणा-या पर्यायी खर्चास आयुक्त यांनी दि.११/१२/२०२४ रोजी मान्यता दिल्यानुसार उक्त कामाची दुस-या वेळेस ई निविदा सुचना क्रं. ५७९ प्रसिध्द केली असता निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०३ ई- निविदा सदर संकेस्थळावर प्राप्त झालेल्या आहे.महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ मंत्रालय मुंबई दिनांक २७/०९/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार तिन निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे त्यानुसार आलेल्या ई-निविदांची छाननी केली असता. खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु. ६८१८७३५/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | ज्ञानेश्वर पुंडलिक पाटील | निविदा रक्कमेइतकेचेच दराने | ६८१८७३५/- |
| २ | सिध्दार्थ विनोदकुमार दधिच | निविदा रक्कमेपेक्षा ७% कमीचे दराने | ६३४१४२४/- |
| ३ | विवेक प्रभाकर खर्चे | निविदा रक्कमेपेक्षा ४.१००% कमीचे दराने | ६५३९१६६/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार सिध्दार्थ विनोदकुमार दधिच यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा ७% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु ६३४१४२४/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टीग चार्जेस, व रॉयलटी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ६३४१४२४/- |
| ०२ | जि.एस.टी.१८% | ११४१४५६/- |
| ०३ | कामगार विमा ०.५०% | ३१७०७/- |
| ०४ | टेस्टीग चार्जेस | ७६५८०/- |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | ७६८१/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | ७५९८८४८/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.७५९८८४८/- मात्र आहे. परंतु मक्तेदार सिध्दार्थ विनोदकुमार दधिच यांचे निविदा रक्कमेपेक्षा ७% कमीचे दर सर्वात कमी आलेले असुन निविदा अटी शर्ती नुसार १ ते १० टक्के कमीचे दरा पर्यंत १ टक्का व त्यावरील ११ ते १५ टक्का पर्यंतच्या कमीचे दरास प्रति टक्याला १ टक्का याप्रमाणे परफार्मन्स सिक्युरिटी डि.डी. सादर करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने मक्तेदार सिध्दार्थ विनोदकुमार दधिच यांनी निविदा रक्कमेपेक्षा ७% कमीचे दर सादर केलेले असल्याने त्यांच्या कडुन १% परफार्मन्स सिक्युरिटी म्हणुन अनामत रक्कम रु.७५९८८/- मात्रचा डि.डि.मनपा खजीन्यात सादर करण्या करीता मक्तेदार यांना पत्राद्वारे डि.डी सादर करण्यासाठी कळविले असता मक्तेदार यांनी मुदतित मनपा पावती क्रं.७६९७दि. ०३/०२/२०२५ रोजी रक्कम रु.७५९८८/- मात्रचा डि.डी. क्रं. १३४०३६ रक्कम रु.७५९८८/- मात्रचा जमा केलेला आहे. तशी पावतीची छायांकीत प्रत जोडलेली असुन त्यानुसार सदर कामी वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.७५९८८४८/- मात्र आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम रु. ७५९८८४८/- मात्र मुलभुत सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद योजने अंतर्गत निधीतुन करावा लागणार आहे. त्याअनुषंगाने मक्तेदार सिध्दार्थ विनोदकुमार दधिच यांचे निविदा रक्कमेपेक्षा ७% कमीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ३ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४१** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०५** **प्रशासक ठराव क्र.:- २३५** **दिनांक :-१३/०२/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. कार्यकारी कर अधिक्षक, किरकोळ वसुली विभाग यांचेकडिल जा.क्र./कि.व./३३५०/२०२४-२५ दि.०७/०२/२०२५
३. मुख्यलेखा परिक्षक यांचा दि.१७/१२/२०२४ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.१६/१२/२०२४ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा अभिप्राय

**विषय :-** किरकोळ वसुली विभागाकडुन वसुल करण्यात येणाऱ्या मांडव फी, स्टेज फी, कमान (स्वागत गेट) परवानगी फी च्या दरांमध्ये वाढ करणेबाबत तसेच अनधिकृत विना परवानगी उभारण्यात येणारे मांडव, स्टेज व कमान (स्वागत गेट) यांचे कडुन रु.१,०००/- दंड आकारणे बाबत.

---

वाचा क्र.१ व कार्यकारी कर अधिक्षक, किरकोळ वसुली विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका हद्दित उभारण्यात येणारे मांडव, स्टेज, स्वागत गेट (कमानी) तात्पुरत्या स्वरुपात उभारणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २३४ अन्वये स्थायी सभा ठराव क्र.२८२ दिनांक २७/०२/२००६ अन्वये विहित शुल्क आकारुन परवानगी देण्याची कार्यवाही करण्यात येते.

परंतु सदर ठरावातील दर हे १८ वर्षा पुर्वी (दि.२७/०२/२००६) ठरविण्यात आलेले आहे. तेव्हा पासुन आजपावेतो सदर दरांमध्ये कोणत्याही प्रकारची वाढ नाही. त्यामुळे सद्यास्थितीत मांडव फी, स्टेज फी, कमान (स्वागत गेट) यांच्या परवानगी शुल्का पासून सन २०२३-२४ मध्ये साधारण एकुण रु.२,००,०००/- उत्पन्न महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहे. सदर परवानगी देण्याकरिता सद्यास्थितीत येणारा आस्थापना, यंत्र सामुग्री व इतर खर्च विचार करुन जळगांव शहर हद्दित उभारण्यात येणारे मांडव, स्टेज, स्वागत गेट (कमानी) यांना तात्पुरत्या स्वरुपात परवानगी देणेकामी आकारण्यात येणारी फी वाढ करुन नव्याने धोरण ठरविणे आवश्यक आहे. सबब परवाना फी दरासंदर्भात आस्थापना, यंत्रसामुग्री व इतर बाबींचा विचार करुन खालील परिशिष्ट "अ" मध्ये नमुद केल्याप्रमाणे दर प्रस्तावित करणे आवश्यक आहे.

**परिशिष्ट "अ"**

| अ. क्र. | महानगरपालिका कर | सद्याचा दर (प्रति दिवस) ठराव क्र.२८२ दि.२७/०२/२००६ नुसार | एका वर्षात साधारणत: जमा होणारी रक्कम | सुचविण्यात आलेला वाढीव दर | नविन दरानुसार एका वर्षात जमा होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | मांडव फी | ०.५०/- पैसे प्रति चौ. फुट | साधारण रक्कम रु.२,००,०००/- | रु. २/- प्रति चौ.फुट प्रति दिवस | अंदाजित रक्कम रु. ८,००,०००/- इतकी वाढ होईल. |
| २ | स्टेज फी | ०.५०/- पैसे प्रति चौ. फुट | | रु. २/- प्रति चौ.फुट प्रति दिवस | |
| ३ | स्वागत गेट (कमान) | प्रतिनग रु.२००/- प्रमाणे | | रु.५००/- प्रति नग प्रति दिवस | |

परिशिष्ट "अ" मध्ये नमुद जुन्या दराने एका वर्षात जळगांव शहर हद्दित उभारण्यात येणारे मांडव, स्टेज, स्वागत गेट (कमानी) च्या परवाना शुल्क पोटी साधारण रक्कम रु.२,००,०००/- मात्र जमा होते. नविन दरानुसार साधारण एका वर्षात अंदाजित रक्कम रु. ८,००,०००/- इतकी वाढ होईल. यावरुन परवाना फी पोटी प्राप्त होणाऱ्या उत्पन्नात एकुण रक्कम अंदाजित रक्कम रु.६,००,०००/- मात्र इतकी वाढ होऊ शकते.

तसेच महानगरपालिकेची पूर्व परवानगी शिवाय उभारण्यात येणाऱ्या मांडव, स्टेज व कमान (स्वागत गेट) यांचे कडुन रु.१,०००/- प्रति मांडव, स्टेज व कमान (स्वागत गेट) दंड याप्रमाणे आकारणी करणे योग्य होईल. *त्यामुळे विनापरवानगी अनधिकृत रित्या मांडव, स्टेज व कमान (स्वागत गेट) उभारणेच्या प्रवृत्तीला प्रतिबंध होईल.*

तरी प्रस्तुत प्रकरणी महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ करणेच्या दृष्टीने व अनधिकृत रित्या मांडव, स्टेज व कमान (स्वागत गेट) उभारणेच्या प्रवृत्तीला प्रतिबंध करणेच्या हेतुने, किरकोळ वसुली विभागाकडुन वसुल करण्यात येणाऱ्या मांडव फी, स्टेज फी, कमान (स्वागत गेट) परवानगी फी च्या दरांमध्ये वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे वाढ करणेकामी व अनधिकृत विना परवानगी उभारण्यात येणारे मांडव, स्टेज व कमान (स्वागत गेट) यांचे कडुन रु.१,०००/- दंड आकरणेकामी मान्यता मिळण्यासाठी कार्यकारी कर अधिक्षक, किरकोळ वसुली विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ४१** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०६** **प्रशासक ठराव क्र.:- २३६** **दिनांक :-१३/०२/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/८२/२०२४-२५ दि.१३/०२/२०२५

३. सहाय्यक आयुक्त यांचा दि.२१/०१/२०२५ चा अभिप्राय

४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.११/०२/२०२५ चा अभिप्राय

५. आयुक्त यांचा दि.११/०२/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका प्रशासकीय विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (पेट्रोल) ६००० लिटर खरेदी करणे बाबत प्रस्ताव.

---

वाचा क्र.१ व वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महानगरपालिका प्रशासकीय विभागाकरिता मारुती सुझुकी लि. कंपनीची MARUTI CIAZ SIGMA 1.5L MT-02 Nos, MARUTI FRONX SIGMA 1.2L MT-02 Nos, MARUTI GRAND VITARA SIGMA 1.5L MT-01 Nos असे एकूण ०५ नग नविन वाहने खरेदी करण्यात आलेली आहेत. वर नमूद नविन वाहनांसाठी आर्थिक वर्ष-२०२३-२४-२५ करिता ६००० लिटर्स पेट्रोल खरेदी कामी पंप ऑपरेटर यांच्या दि.१४/०१/२०२५ चे मागणी वाहन विभागास प्राप्त झालेली आहे. त्यानूसार सदर वाहनांसाठी किरकोळ स्वरुपात पेट्रोल खरेदी करणे आवश्यक व गरजेचे आहे. त्याकरिता जळगांव शहरातील इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव यांचेकडून किरकोळ दरात इंधन (पेट्रोल) खरेदी कामी प्रोफॉर्मा इनव्हास प्राप्त झालेले आहे.

मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव यांना यापुर्वी देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील मागणी नुसार आज पावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. तसेच इंधन पुरवठा बाबत कोणतीही तक्रार नाही. महानगरपालिका प्रशासकीय विभागाकडील नविन वाहनांसाठी पेट्रोल पुरवठा करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव हा पंप एम.आय.डी.सी.रोडवर असल्याने सदर पंपावरुन पेट्रोल घेणे सोयीचे होईल. शासनाच्या धोरणानुसार दर कमी / जास्त झाल्यास त्या दरानुसार पेट्रोल खरेदी करण्यात येईल.

तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (पेट्रोल) किरकोळ स्वरुपात खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२४-२५/१० दि.१४/०१/२०२५ अन्वये ६००० लिटर पेट्रोल खरेदी कामी रक्कम रु.६,३३,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. अधिकृत विक्रेते मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्या कडुन खरेदी करणेस व या कामी येणाऱ्या एकुण रक्कम रु.६,३३,०००/- मात्रचे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार मान्यता मिळण्यासाठी वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ४१** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०७** **प्रशासक ठराव क्र.:- २३७** **दिनांक :-१३/०२/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/८१/२०२४-२५ दि.१३/०२/२०२५
३. सहाय्यक आयुक्त यांचा दि.२३/०१/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.२३/०१/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२९/०१/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.२९/०१/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणे बाबत प्रस्ताव.

---

वाचा क्र.१ व वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

पंप ऑपरेटर यांच्या दि.१७/०१/२०२५ चे मागणीनूसार म.न.पा. वाहनांसाठी डिझेलसाठा ३६३५ लिटर शिल्लक असुन लागणारा शिल्लक डिझेल साठानुसार ४ ते ५ दिवसांसाठी पुरवठा होईल. सबब पंप ऑपरेटर यांनी मागणी क्रं.१४११० दि.१७/०१/२०२५ अन्वये १२,००० लिटर डिझेलची मागणी केलेली आहे.

दि.०९/०७/२०२२ पासून डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दरात (रेट) फरक असल्याने मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडुन दि.०८/०७/२०२२ पासून किरकोळ डिझेल खरेदी महासभा/स्थायी समितीच्या मान्यतेने सुरु आहे. किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजार भाव) व बल्क दर या दोघामध्ये जो पर्यंत फरक राहील तो पर्यंत बाजार भावातून किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील. मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव यांचे दर प्रति लिटर एकुण रक्कम रु.९२.०३ मात्र असुन, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन मनमाड टर्मिनल यांचे ठोक/बल्कचे प्रती लिटरचे दर रक्कम रु.९२.२४ मात्र आहेत.

महासभा ठराव क्रं.१२७० दि.२३/०८/२०२३ अन्वये तसेच स्थायी समितीने वेळावेळी पारीत केलेल्या ठरावानुसार आवश्यकतेप्रमाणे १२००० लिटर्सचा पुरवठा आदेश देवून किरकोळ डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार निविदा न मागविता किरकोळ डिझेल खरेदी करण्यात येत आहे.

मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना मागील देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभाग प्रमुखांच्या मागणीनुसार दि.२३/०९/२०२४ ते आज पावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. तसेच मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव हा पंप एम.आय.डी.सी. रोडवर असल्याने सदर पंपावरुन म.न.पा. वाहनांसाठी डिझेल घेणे सोईचे होते.

तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात १२००० लिटर डिझेल खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२४-२५/११ दि.१७/०१/२०२५ अन्वये रक्कम रु.११,०४,३६०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार निविदा न मागविता मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्या कडुन १२००० लिटर किरकोळ डिझेल खरेदी करणेस व या कामी येणाऱ्या एकुण रक्कम रु.११,०४,३६०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळण्यासाठी वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४१** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०८** **प्रशासक ठराव क्र.:-२३८** **दिनांक :-१३/०२/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदा.

**विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

---

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१३३ दि.०३/०१/२०२५ नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना २०२४-२५ अंतर्गत प्रभाग क्रं.०९ मधील दत्त मंदिर परिसरातील वाय डी. पाटील ते बडगुजर चक्की पर्यंतचा रस्ता काँक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार स्वप्निल नरेंद्र चौधरी यांचे निविदा रक्कमेपेक्षा १७.९९% सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.८,१५,९६०/- मात्र खर्चाची संविदा.

२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१३४ दि.०३/०१/२०२५ नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना २०२४-२५ अंतर्गत प्रभाग क्रं.१६ मधील रणछोडदास नगर व एकता कॉलनी परिसरातील आर.सी.सी. गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे कामी मक्तेदार रूपेश प्रविण राणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा १.२०% सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.९,८७,५२८/- मात्र खर्चाची संविदा.

३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१३५ दि.०३/०१/२०२५ नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना २०२४-२५ अंतर्गत प्रभाग क्रं.०९ मधील सुभाष सनेर ते गट नं.२६ मुक्ताई नगरच्या नाल्यापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार स्वप्निल नरेंद्र चौधरी यांचे निविदा रक्कमेपेक्षा १८% सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.८,१८,०६८ /- मात्र खर्चाची संविदा.

उपरोक्त वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार संविदांची माहिती घेतली.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**